


दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25




वर्ष १८ वे । अंक २१६ किंमत - 2 रू
संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.)
बुधवार । १० /०९ /२०२५ । पाने- ४




## शिवसेनेत पुन्हा भुकंप ?



मुंबई (वृत्तसंस्था)

शिवसेनेच्या फुटीनंतर लोकसभा निवडणुकीत काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गट यांच्या महाविकास आघाडीने घवघवीत यश मिळवले होते. तर भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या महायुतीला पराभवाचा सामना करावा लागला होता. यानंतर विधानसभा निडवणुकीत महायुतीने महाविकास आघाडीचा दारुण पराभव केला. आता मुंबई महानगर पालिका निवडणुकीपूर्वी महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ उडवणारी बातमी समोर आली आहे.

शिवसेनेचे (शिंदे गट) आमदार कृपाल तुमाने यांनी एक मोठा दावा करत राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आणले आहे. त्यांनी म्हटलंय की, उद्धव ठाकरे गटातील दोन आमदार सोडले, तर उर्वरित सर्व आमदार शिवसेनेच्या (शिंदे गट) संपर्कात आहेत आणि लवकरच पक्षप्रवेश करणार आहेत. अनेक आमदार संजय राऊत यांच्या भूमिकेवर नाराज आहेत, असा दावा देखील कृपाल तुमाने यांनी केलाय. दसरा हा शिवसेनेसाठी महत्त्वाचा दिवस असतो आणि याच दिवशी अनेकदा पक्षाच्या मोठ्या घोषणा झाल्या आहेत. यावेळीही दसऱ्यानंतर मोठा पक्षप्रवेश सोहळा होणार असल्याचे संकेत देखील कृपाल तुमाने यांनी दिले आहेत.

## जर्शी गोऱ्हे प्रश्नावर शिवआर्मीचा एल्गार





युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - निसर्गाच्या अवकृपेमुळे, लहरी वातावरणामुळे आणि सरकारच्या धोरणांमुळे शेतकरी हवालदिल होऊन मोठ्या संकटात सापडला आहे. राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा करून शेतकऱ्यांना उध्वस्त केले जात आहे. त्यामुळे आता सरकारनेच भाकड जनावरे जर्शी जनावरे यांच्या पालन पोषणाची जबाबदारी घ्यावी या मागणीसाठी शिवआर्मी शेतकरी संघटनेच्यावतीने येथील प्रांत कार्यालयावर जनावरांसह मोर्चा काढण्यात आला. यावेळी प्रशासनाला दिलेले निवेदनात म्हंटले आहे की, अर्धवट अंमलात आलेल्या गोवंश हत्याबंदी कायद्यामुळे भाकड जनावरे आणि जर्शी गोऱ्हे यांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. यापूर्वीही २९ जुलै व १२ ऑगस्ट रोजी निवेदन आणि आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधण्यात आले होते, मात्र शासन स्तरावर अजून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे शिवआर्मी शेतकरी संघटनेच्या पुन्हा मोर्चा काढून पुढील मागण्या मांडल्या आहेत.

भाकड जनावरे व गोऱ्ह्यांची सरकारी खरेदी योजना तातडीने राबवावी. गोशाळा किंवा शासकीय संगोपन केंद्रे स्थापन करून या जनावरांची व्यवस्था करावी. शेतकऱ्यांना बाजारभावानुसार भरपाई देऊन मोकाट गुरांमुळे होणारी जीवित व वित्तहानीची जबाबदारी सरकारने घ्यावी. कायदेशीर गोवंश वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या तथाकथित गोरक्षकांचा बंदोबस्त करावा.

स्वदेशी गाईंच्या उत्पादकतेसाठी प्रभावी ब्रीडिंग पॉलिसी लागू करावी. पांजरपोळमध्ये जमा केलेल्या जनावरांचे ऑडिट करून पारदर्शकता आणावी. दूध व दुग्धजन्य पदार्थातील भेसळ रोखून पशुखाद्य व औषधांचे दर नियंत्रित करावेत. दुधाला उत्पादन खर्चावर आधारित दर जाहीर करावा.

संघटनेचे अध्यक्ष दत्ता ढगे यांनी स्पष्ट केले की, शेतकरी आज आर्थिक संकटात सापडले आहेत. शासनाने जर वेळेवर उपाययोजना केली नाही तर शेतकऱ्यांचा उद्रेक होऊ शकतो. त्यामुळे मुख्यमंत्री यांनी या मागण्यांची तातडीने दखल घेऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी शिवआर्मी शेतकरी संघटनेतर्फे करण्यात आली आहे.

## मिरवणूकीत डीजे वाजले, दोघांवर गुन्हे दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरात काल सोमवारी ईद-ए-मिलाद मिरवणुकीदरम्यान परवानगी न घेता डीजे वाजवून ध्वनी प्रदूषण करणाऱ्यांविरोधात शहर पोलिसांनी कठोर कारवाई केली. दोन डीजे वाहने व त्यांच्या चालकांविरोधात गुन्हे दाखल करून वाहने जप्त करण्यात आली आहेत. ध्वनी प्रदूषण अधिनियमानुसार कोणतेही वाद्य किंवा लाऊड स्पीकर वापरण्यासाठी पोलीस परवानगी आवश्यक असते. यासाठी वेळ आणि आवाजाची मर्यादा निश्चित केली जाते. मात्र, या मिरवणुकीला परवानगी देण्यात आली असली तरी लाऊड स्पीकर किंवा डीजे वाहनांना परवानगी नव्हती. तरीदेखील दोन डीजे वाहने मिरवणुकीत सामील करण्यात आली. अशी माहिती पोलिस उप अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी दिली. या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम २२३, पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ३ व १५ तसेच ध्वनी प्रदूषण अधिनियम २००० अंतर्गत स्वतंत्र दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दोन्ही डीजे वाहने ताब्यात घेण्यात आली असून, तपासात आयोजकांची नावे समोर आल्यानंतर त्यांनाही सहआरोपी करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.




## नेपाळमध्ये हिंस्त्र आंदोलन, सरकार अस्थिर

काठमांडू (वृत्तसंस्था(



सोमवारपासून नेपाळमध्ये सोशल मीडियावरील बंदीवरून तरुणांचे निदर्शने सुरू आहेत. यामध्ये आतापर्यंत १९ जणांचा मृत्यू झाला आहे. काल गृहमंत्रीपदाचा राजीनामा देणारे रमेश लेखक यांच्या घराची तोडफोड आणि आग लावण्यात आली आहे.

दरम्यान, सरकारमध्ये राजीनाम्यांची मालिका सुरू झाली आहे. गृहमंत्री रमेश लेखक यांच्यानंतर मंगळवारी कृषीमंत्री रामनाथ अधिकारी यांनी राजीनामा दिला. काठमांडू पोस्टनुसार, प्रश्न विचारणाऱ्यांना दडपणे चुकीचे असल्याचे अधिकारी यांनी म्हटले आहे. आरोग्यमंत्री प्रदीप पौडेल यांनी राजीनामा दिल्याच्या बातम्याही येत आहेत. अशा परिस्थितीत सरकारमध्ये राहण्यात काही अर्थ नाही असे त्यांनी म्हटले आहे. नेपाळी काँग्रेसचे सरचिटणीस गगन थापा यांनीही नैतिक जबाबदारी स्वीकारत पदाचा राजीनामा देण्याची घोषणा केली आहे.

प्रचंड दबावादरम्यान, नेपाळमध्ये युती सरकार तुटण्याचा धोका वाढला आहे. जुलै २०२४ पासून देशात शेर बहादूर देउबा यांचा नेपाळी काँग्रेस ८८ जागांसह आणि केपी शर्मा ओली यांचा सीपीएन (यूएमएल) ७९ जागांसह एकत्रितपणे सरकार चालवत आहेत. आतापर्यंत सर्व राजीनामे नेपाळी काँग्रेसच्या नेत्यांनी दिले आहेत. नेपाळचे पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांनी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. पंतप्रधानांच्या विधानानुसार, ते परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आणि समस्या सोडवण्यासाठी संबंधित पक्षांशी बोलत आहेत.`.

## सकल मराठा समाजाच्या वतीने संगीता वानखडे हिचा जाहीर निषेध

युवावार्ता(प्रतिनिधी)



संगमनेर - सोशल मीडियाच्या माध्यमातून युटच्यूबवर कुणाच्यातरी सांगण्यावरून कुणाचेही बद्दल अत्यंत वाईट आणि बेताल वक्तव्य करणाऱ्या संगीता वानखेडे या महिलेविरुद्ध संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मोठी संतापाची लाट निर्माण झाली असून अभद्र भाषा बोलणाऱ्या या महिलेवर कठोर कारवाई करा अशी मागणी संगमनेर तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले असून वानखेडे हिचा तीव्र निषेध करण्यात आला आहे.

संगमनेर पोलीस स्टेशन येथे याबाबतचे निवेदन देण्यात आले. यावेळी अर्चनाताई बालोडे, पद्मा थोरात, प्रमिला अभंग, शितल भुसाळ, अमृता राऊत, बेबीताई थोरात, सुनिता कांदळकर, मीना पटेल, सपना मंडलिक, छाया देशमुख, उज्वला गोडगे, मनीषा शिंदे, वैशाली बर्गे, सुरेश झावरे, तात्या कुटे, सत्यजित थोरात, सुरेश थोरात, सौरभ कोल्हे आदि मान्यवर उपस्थित होते.

या निवेदनात म्हटले आहे की संगीता वानखेडे ही पैसे घेऊन कुणाचेही बदनामीकारक वक्तव्य करत आहेत. तिचे बोलणे अत्यंत अभद्र आणि बेताल आहे यामुळे समाजामध्ये तेढ निर्माण होत आहे याचबरोबर महिलांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. महिला असून महिलांबद्दल बेताल भक्त व करणाऱ्या या बाई बद्दल संपूर्ण महाराष्ट्रात अत्यंत रोष निर्माण झाला आहे. (पान २ वर)












# संपादकीय...

## जीएसटी सुधारणा

सणांच्या दिवसांत आनंद ओसंडून वाहत असतो. मात्र, यंदा सणांचा आनंद काहीसा लवकरच सुरू झाला आहे. कारण, केंद्र सरकारने वस्तू व सेवा कर (जीएसटी) संदर्भात केलेल्या महत्त्वाच्या सुधारणा नुकत्याच जाहीर केल्या आहेत. या सुधारणा प्रत्यक्षात २२ सप्टेंबरपासून लागू होणार असल्या, तरी त्यांची घोषणा आधीच झाल्यामुळे बाजारपेठेत सध्या 'फील गुड'चं वातावरण आहे. ग्राहक, विक्रेते आणि उत्पादक या तिघांनाही या बदलांचा थेट परिणाम जाणवेल, हे निश्चित आहे. भारतीय संस्कृतीत सणांचा वर्षभर उत्साह असतो. मात्र, दिवाळी हा सणांचा राजा असं म्हटलं जातं. दिवाळीनिमित्त बाजारपेठेत होणारी उलाढाल, खेळणारा पैसा हा इतर कोणत्याही काळापेक्षा कितीतरी जास्त असतो. नवरात्रापासूनच ग्राहकांचा ओघ वाढतो. या पार्श्वभूमीवर जीवनावश्यक वस्तू, घरगुती उपकरणं, वाहनं यांसारख्या वस्तूंच्या किमती कमी होणार असल्याने यंदा मागणीत मोठी वाढ होईल, असा अंदाज अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. मागणी वाढली की उत्पादन वाढणारच, आणि त्यातून रोजगारनिर्मितीही अपरिहार्य ठरणार आहे. अशा रीतीने अर्थचक्राला गती मिळून या सणासुदीचा आनंद दुप्पट होईल. जीएसटी प्रणालीची सुरुवात जुलै २०१७ मध्ये झाली होती. करप्रणालीत एकसंधता आणण्यासाठी हे पाऊल आवश्यकच होतं, आणि त्याचं स्वागतही झालं. मात्र, सुरुवातीपासूनच अनेक तक्रारी होत्या. पाच वेगवेगळ्या करश्रेण्या ठेवण्यात आल्या होत्या. वस्तूंचं वर्गीकरण गोंधळात टाकणारं होतं. उदाहरणार्थ, चपाती आणि पराठ्यावर वेगळा कर आकारला जात होता. महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या सॅनिटरी पॅड्सवर कमी कर ठेवला गेला, पण त्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालावर उलट अधिक कर होता. कपड्यांच्या बाबतीतही विसंगती होती - सुती धाग्यावर १८%, कृत्रिम धाग्यावर १२% आणि तयार कपड्यांवर फक्त ५%! खाण्याचे पदार्थ किंवा औषधं सुटी विकली तर कमी कर; पण तीच पॅकबंद केली, तर कर जास्त. अशा विसंगत तरतुदींवर व्यापाऱ्यांनी सातत्याने नाराजी व्यक्त केली होती. कर भरण्याच्या प्रक्रियेतली क्लिष्टता ही आणखी एक गंभीर समस्या होती. परताव्याच्या मागण्या महिनोंमहिने प्रलंबित राहात, उलट काही तास उशिरा कर भरल्यास नोटिसा येत. व्यापाऱ्यांकडे व्यापारी व्यवहार सांभाळण्याची जबाबदारी असते, मात्र संगणकीय तांत्रिकतेत ते कमी पडत. त्यामुळे जीएसटी ही सनदी लेखापालांच्या फायद्याचीच प्रणाली आहे, अशी टीकाही झाली होती. प्रत्यक्षात सतत बदलणारे नियम, सर्व्हरच्या समस्या यामुळे सनदी लेखापालांनाही त्रास होत होता. आता जाहीर केलेल्या जीएसटी ०.२ मध्ये या सगळ्या समस्यांवर उपाययोजना होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. राज्यांमध्ये करदरातील फरकामुळे राष्ट्रीय पातळीवर मोठ्या उद्योगांना अडचणी येत होत्या. त्यामुळेच २०२५ च्या अखेरीस राष्ट्रीय स्तरावर अपिलीय न्यायाधिकरण सुरू करण्याचं आश्वासन महत्त्वाचं ठरत आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, बहुतांश जीवनावश्यक वस्तूंच्या करश्रेणीत घट होणार आहे. यामुळे सरकारच्या महसुलात सुरुवातीला जवळपास ४७ हजार कोटी रुपयांची घट होईल, असा अंदाज आहे. पण भारताच्या अर्थव्यवस्थेच्या एकूण आकाराच्या तुलनेत ती किरकोळच आहे. शिवाय, करकपातीमुळे व्यवहार वाढतील आणि वाढत्या उलाढालीतून अधिक कर उत्पन्न मिळेल, अशी अर्थ विभागाची खात्री आहे.


HAPPY Birthday



श्री. जालिंदर रामनाथ दिघे
संस्थापक मार्गदर्शक -
J.D. बिर्याणी हॉटेल
दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

READ E-NEWS ON YUVAVARTA.IN
दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
READ NEWSPAPER ON YUVAVARTA.COM

**पाहिजेत**
हरी ओम मॉड्युलर किचन येथे मार्केटिंगसाठी
महिला व पुरुष पाहिजेत
सिटी सेंटर मॉल, मालदाड रोड, संगमनेर, जि. अ.नगर
8824481246

**पाहिजेत**
ब्युटी पार्लरचे तीन वर्षापासूनचे वळण असलेली 750 स्क्वे. फुट जागा, तीन रूम ब्युटी पार्लरसाठी रेंट वरती देणे आहे
पत्ता - मेहर शाळेजवळ संगमनेर टेक्सटाईल रोड विद्यानगर, संगमनेर
8999862759

साईझ - 8 x 10 चौ. सें.मी.
जाहिरातीसाठी सुवर्णसंधी
संपर्क - ९८२२०३९४६०


### ग्रामपंचायत निमगाव खैरी, ता. श्रीरामपूर जि. अहिल्यानगर (ब - १ निविदा)

खालील कामांच्या मोहरबंद ब-१ निविदा, दोन लिफापे पद्धतीनुसार मा. सरपंच ग्रामपंचायत निमगाव खैरी ता. श्रीरामपुर यांचे वतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. या कामाच्या कोऱ्या निविदा रक्कम २३६ असून ग्रामपंचायत निमगाव खैरी या कार्यालयात दि. १०/०९/२०२५ ते १९/०९/२०२५ पर्यंत ग्रामपंचायत निमगाव खैरी ता. श्रीरामपुर निविदा फी भरल्यास देण्यात येतील. मोहरबंद निविदा ग्रा. पं. निमगाव खैरी कार्यालयात दिनांक १९/०९/२०२५ पर्यंत स्विकारून शक्यतो त्याच दिवशी सायंकाळी ५:०० वाजता उघडण्यात येतील.

**निविदा मागणी कालावधी १०/०९/२०२५ ते १९/०९/२०२५**

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | कामाचा कालावधी | ठेकेदाराचा वर्ग | अनामत रक्कम(१%) | योजना १५ वा वि. आ. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अंगणवाडी केंद्र गावठाण क्र. १ ते ३, इंदिरानगर, शेजूळ वस्ती, कालंगडे वस्ती नळ कनेक्शन देणे. | ८४६९५/- | ३ महिना | सु.बे. अभि | ८४६/- | २०२५/२६ |
| २ | ग्राम स्वच्छता करणे | ८४७००/- | ३ महिना | मजूर संस्था | ८४७/- | २०२३/२४ |
| ३ | निमगाव राजवाडा (आनंद नगर) समाजमंदिर दुरुस्ती करणे. | २७६५४९/- | ३ महिना | खुला | २७६५/- | २०२५/२६ |
| ४ | स्मशानभूमी दुरुस्ती करणे. | १२४०००/- | ३ महिना | सु.बे. अभि | १२४०/- | २०२५/२६ |
| ५ | जि.प. प्राथ. शाळा खैरी स्टेज दुरुस्ती करणे. | ८४१७२/- | ३ महिना | सु.बे. अभि | ८४१/- | २०२३/२४ |
| ६ | जि. प. प्राथ शाळा खैरी डिजिटल करण. | ८४५००/- | ३ महिना | सु.बे. अभि | ८४५/- | २०२३/२४ |
| ७ | जि. प. प्राथ. शाळा निमगाव किचन शेड दुरुस्ती | २५१६६७/- | ३ महिना | खुला | २५१६/- | २०२५/२६ |
| ८ | जि. प. प्राथ. शाळा निमगाव किचन शेड दुरुस्ती | ४०९८६/- | ३ महिना | खुला | ४०९/- | २०२३/२४ |
| ९ | जि. प. प्राथ. शाळा निमगाव पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | ८३४५७/- | ३ महिना | खुला | ८३४/- | २०२३/२४ |
| १० | गावठाण अंगणवाडी दुरुस्ती करणे. | ३४६६७/- | ३ महिना | मजूर संस्था | ३४६/- | २०२३/२४ |
| ११ | इंदिरानगर शौचालय दुरुस्ती करणे. | ३६२६४/- | ३ महिना | मजूर संस्था | ३६३/- | २०२४/२५ |

टीप:- १) उपरोक्त कामाच्या निविदा कोणतेही कारण न दाखविता स्वीकारण्याच्या किंवा नाकारण्याचा अधिकार मा. सरपंच ग्रामपंचायत निमगाव खैरी ता. श्रीरामपुर यांनी राखीव ठेवला आहे. २) ठेकेदाराने कोऱ्या निविदा संचाचे अर्जासोबत अद्यावत नोंदणी दाखल्याच्या, PAN क्रमांक, GST क्रमांक प्रती जोडणे आवशक आहे. ३) कामाचा व कामावरील मजुरांचा शासकीय विमा उत्तरवणे ठेकेदारास बंधनकारक.

**सरपंच**
**ग्रा.पं. निमगाव खैरी ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर**

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रा.पं. निमगाव खैरी ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर**

## सकल मराठा समाजाच्यावतीने...

पान ०१ वरुन- मराठा समाज मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली आरक्षणासाठी आंदोलन करत असताना या समाजाविरुद्ध या बाईने अत्यंत खालच्या पातळीचे वक्तव्य केले. त्यामुळे संपूर्ण मराठा समाजात मोठा रोष निर्माण झाला असून मराठा समाजाबरोबर ओबीसी समाज यांनीही या बाई विरुद्ध तक्रारी केल्या आहेत. पैसे दिले की कुणाबद्दलही वाईट बोलणारी ही बाई महाराष्ट्राला कलंक असल्याची टीका तालुकाध्यक्ष अर्चनाताई बालोडे यांनी केली असून अशा बेताल वक्तव्य करणार्या महिलेवर पोलिसांनी त्वरित कारवाई करावी अशी मागणी उपस्थित सर्व महिला भगिनी व मराठा समाजाच्या नागरिकांनी केली आहे. यावेळी संगीता वानखेडे हिच्या निषेधच्या घोषणा देण्यात आल्या

### श्री यशोदेव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संगमनेर

।। शिवमस्तु सर्व जगतः ।।

रजि.नं.ए.एन.आर./एस.एन.आर./आर.एस.आर./सी.आर २६५८/९९ रजि. दि. १२/१०/१९९९

**श्री यशोदेव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संगमनेर**

कार्यालय : मालाणी निवास, बाजारपेठ, संगमनेर, जि.अहिल्यानगर, फोन : २२७८५५
विस्तारित कक्ष : मौनी कॉम्प्लेक्स, जाणता राजा मैदान रोड, विद्यानगर, संगमनेर, फोन : २२४९५५

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस** (फक्त सभासदांसाठी)

**श्री यशोदेव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संगमनेर**, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर या संस्थेची **२६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दि. २३/०९/२०२५ रोजी दुपारी ४.०० वा. श्री. मु. र. भंडारी मंगल कार्यालय, अशोक चौक, संगमनेर** या ठिकाणी संस्थेचे विद्यमान **चेअरमन सीए श्री. हर्षल राजेंद्र गुंदेचा** यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करणेसाठी आयोजित करण्यात आली आहे. तरी सन्माननीय सभासदांनी सदर सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**-: सभेपुढील विषय :-**

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) सन २०२४-२५ चा ताळेबंद पत्रक, नफा-तोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजूरी देणे. (पान.नं.६ वर)
४) सन २०२४-२५ चा शासकीय ऑडीट रिपोर्टची नोंद घेणे.
५) सन २०२३-२४ च्या ऑडीट दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेणे.
६) सन २०२५-२६ सालाकरिता तयार केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
७) सन २०२४-२५ अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
८) सन २०२५-२६ सालाकरिता वैधानिक लेखा परिक्षकाची नेमणूक करणे.
९) सन २०२५-२६ सालाकरिता लोकल ऑडीटरची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरवणे.
१०) मा.सहकार आयुक्त,म.राज्य यांचे निर्देशानुसार सुधारीत आदर्श उपविधी स्विकृती करणे. ( उपविधी शब्दरचना पान नं.१२ वर )
११) मा. अध्यक्षसाहेबांच्या परवाणगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार विनिमय करणे.

स्थळ : संगमनेर
दि. ०९/०९/२०२५

आपला विश्वासू
**रमेश रा. सातपुते** - मॅनेजर
(मा. संचालक मंडळाच्या आदेशाने)

**टिप** : १) कोरम अभावी सभेचे कामकाज तहकुब झाल्यास अर्धा तास थांबून सभेचे कामकाज त्याच ठिकाणी त्याच दिवशी पूर्ण केले जाईल. त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही.
२) सभासदांना कोणत्याही प्रकारची माहिती सर्वसाधारण सभेमध्ये पाहिजे असल्यास तसेच प्रश्न व सूचना करावयाच्या असतील त्यांनी दि.१८/०९/२०२५ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात दुपारी ३.०० वाजेपर्यंत लेखी कळवाव्यात.
३) कृपया सभेस येताना अहवालाची प्रत सोबत आणावी. ४) अर्थिक पत्रकांचा सविस्तर तपशिल संस्थेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केला आहे.

रजि. नं.-पी.एन.ए./आर.एस.आर./३७१ रजि: दिनाक २८/०७/१९७२

### संगमनेर तालुका विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघ मर्यादित संगमनेर

जा. क्र. वा.स.सभा. ५/२०२५ **मु. पो. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** दिनांक- २५/८/२०२५

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस** (सन २०२३- २०२४फक्त सभासदांसाठी)

संगमनेर तालुका विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघ मर्यादित संगमनेर या संस्थेची सन २०२४-२०२५ या वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा **मंगळवार दि. १६/९/२०२५ रोजी दुपारी १.०० वा.** संस्थेचे चेअरमन **श्री. भानुदास शंकर उपाध्ये** यांचे अध्यक्षतेखाली **संस्थेचे कार्यालय कृषी उत्पन्न बाजार समिती संगमनेर ता. संगमनेर, जि. अ.नगर या ठिकाणी** खालील विषयांचा विचार विनिमय करणेसाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी सदर सभेस हजर रहावे. हि नम्र विनंती.

**सभेपुढे येणारे विषय**

१) मा. नियोजित अध्यक्षसाहेब यांना अध्यक्षस्थान स्विकारणे बाबत विनंती करणे.
२) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.
३) दि. ३१/०३/२०२५ अखेरच्या हिशोब पत्रकास मंजुरी देणे नफा वाटणीस मान्यता देणे.
४) सन २०२५-२०२६ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
५) सन २०२४-२०२५ च्या अंदाजपत्रकापेक्षा कमी- जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
६) लेखापरीक्षण अहवाल वाचन करणे बाबद
७) सन २०२५-२०२६ या वर्षासाठी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे बाबद.
८) ऑफिस व गोडाऊन दुरुस्त करणे बाबद.
९) संगमनेर औद्योगिक वसाहत येथे भाडे करारावर घेतलेल्या प्लॉट मध्ये उद्योग व्यवसाय सुरु करणे बाबद.
१०) अ.नगर जिल्हा सहकार बँके मार्फत ग्रामीण कारागिर यांना कर्ज पुरवठा करणे बाबद.
११) ग्रामोद्योग वसाहती बाबत विचार विनिमय करणे.
१२) अ.नगर जिल्हा बँकेत असलेल्या ठेवी, ताळेबंदाप्रमाणे इतर निधी, बांधकाम निधीकडे वर्ग करुन बँकेत स्वतंत्र गुंतवणूक करणे बाबद.
१३) मा. अध्यक्षसाहेब यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

✻ आपले नम्र ✻

**श्री. विजय दत्तात्रय शिपणकार**, सं. सचिव
**श्री. भानुदास शंकर उपाध्ये**, चेअरमन
**श्री. राजेंद्र रंगनाथ अवसक**, व्हा. चेअरमन

**विद्यमान संचालक मंडळ**

श्री. बाजीराव बापूराव साळुके
श्री. भाऊसाहेब भगवतां काठे
श्री. लक्ष्मण जानकू जोशी
सौ. सुनिता सतिष घबाडे
श्री. अरूण रघुनाथ बिबवे
श्री. भाऊसाहब गेणू सिनारे
सौ. योगिता बाळचंद्र जोंधळे
श्री. संपतराव नारायणराव वाकचौरे

टिप १) सभेच्या वेळेस कोरम पूर्ण न झाल्यास त्याच विकाणी अर्धा तास थांबून सभेच्या कामकाजास सुरुवात केली जाईल. त्यात कोरमची अतरणकता हमार नाही. २) सभासदांना संस्थेच्या सन २०२३ २०२४ या काळातील कामकाजासंबंधी काही प्रश्न अथवा सुचना करावयाच्या असल्यास त्याबाबत लेखी मुचना करावयाच्या असल्यास बार्षिक सभेच्या ३ दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत मुझेच्या दिवताखेरीज पोहचतील अशा मेळेस पाठविणे अगर समक्ष आणून देणे. अशा प्रश्नांची उत्तरे व खुलासे मा. संचालक मंडळाकडून दिली जातील. ऐनवेळी विचारलेल्या माहितीचा विचार केला जाणार नाही. ३) वार्षिक अहवाल हिशोबाची पत्रके संयेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

**सभेचे ठिकाण- संस्थेचे कार्यालय कृषी उत्पन्न बाजार समिती संगमनेर ता. संगमनेर जि. अ.नगर**








**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑनलाईनचे कामाकरीता विवाहित महिला पाहिजेत
कॉम्प्युटरचे पूर्ण ज्ञान आवश्यक
आकर्षक पगार
भेटण्याची वेळ संध्याकाळी ६ ते ७.३०
संपर्क - श्री साई मोटार ट्रेनिंग स्कूल श्री संकुल, अकोले नाका, संगमनेर
9325329799

**कारागीर पाहिजेत**
हॉटेल दौलत, घारगाव
सर्व्हिस काउंटर - १० जागा
टेबल बॉय - १०
कॅशियर - ५ | कॅप्टन - ३
हेल्पर- ५ | वेटर - ४
9665670000
8956707646

संगमनेर येथील नामांकित कापड व्यवसायासाठी खालील जागा भरणे आहे
**अकाउंट्स मॅनेजर**
शिक्षण : वाणिज्य (Commerce) विषयातील पदवीधर, एम.कॉम., एम बी ए असल्यास प्राधान्य
कौशल्य : संपूर्ण अकाउंट्स फायनल प्रक्रियेचे ज्ञान असणे आवश्यक. कापड व्यवसायात काम केले असल्यास प्राधान्य
अनुभव : ७-१० वर्षे
इच्छुकांनी बायो डेटा खालील ई- मेल वर पाठवणे
ई- मेल- consult3@thecatalystindia.net

**पाहिजेत** अधिक माहितीसाठी संपर्क - 9527426464 8484046463
1) हेल्पर - 10 जागा
2) मशीन ऑपरेटर - 20 जागा
३) प्रोडक्शन सुपरवायझर - ०५ जागा डिप्लोमा/ डिग्री ऑटोमोबाईल/ मॅकेनिकल/ प्रोडक्शन
पगार योग्यतेनुसार
मुलाखतीची वेळ - सकाळी 10 ते सायंकाळी 05 वाजेपर्यंत
पत्ता - सह्याद्री ॲग्रोव्हेट, प्लॉट नं- 150, MIDC संगमनेर

**पाहिजेत**
कॅशिअर- २ जागा
अनुभवास प्राधान्य
सावतामाळी नगर, अभंग पेट्रोलपंपशेजारी नवीन अकोले, रोड
9890045755

**पाहिजेत**
मेडिकल दुकानासाठी महिला व मुले पाहिजे
प्रभात मेडिकल
नवीन नगर रोड, ताजने मळा, संगमनेर
9921245753

**JOB VACANCY**
POST- TEACHING STAFF
QUALIFICATION- POST GRADUATE IN SCIENCE
1 YEAR EXPERIENCE
Address - Skill Meet Nursing And Paramedical Institute, Shinde Sonography Basement, Navin Nagar Road Sangamner
7387410987

**पाहिजेत**
एका नामांकित पतसंस्थेसाठी खालील पदे भरणे आहे
ब्रांच मनेजर- १ - GDC & A
अकौंटंट/क्लर्क- २ - B.COM
संपर्क:- डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड संगमनेर
९३७००७१७७७
९५१८५५६९३३
९८२२७९१४८४

**पाहिजेत**
अमुल डेअरी मार्ट कृषी-व्हेट दुध यंत्र तयार करणाऱ्या कंपनीसाठी
मार्केटिंग मॅनेजर- ५
ड्रायव्हर- ०२
हेल्पर- ०५
7350628728

**कामगार पाहिजेत**
नामांकित फर्निचर दुकानासाठी
पुरुष - 04 जागा
महिला - 03 जागा
संपर्क- भिंगारे फर्निचर अँण्ड मॉल, विघ्नहर्ता लॉन्स समोर समनापूर रोड, संगमनेर
9834601090

**पाहिजेत**
हॉस्पिटलसाठी अनुभवी किंवा गरजु कर्मचारी पाहिजेत (दिवसपाळी)
अर्जासह भेटावे
डॉ. सिकची हॉस्पिटल,कॅप्टन लक्ष्मी चौक, शनिगल्ली, संगमनेर
9850250723

**पाहिजेत**
महिला कापड दुकानासाठी
महिला सेल्समन - सकाळी 11 ते संध्याकाळी 8वाजेपर्यंत
घर कामासाठी महिला पार्ट टाईम - सकाळी 10 ते 2 वेळ
आकर्षक पगार
9028341313

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरूष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरूष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

**पाहिजेत**
डॉ. शेवाळे हॉस्पिटल विद्यानगर, संगमनेर
आरएमओ- जागा -१ (रात्रपाळी) संध्या. ८ ते सकाळ ९ B.A.M.S./ B.H.M.S.
मेडीकल, आयसीयुमध्ये काम केल्याचा अनुभव
नर्स - जागा -१ (रात्रपाळी) संध्या. ८ ते सकाळ ९ G.N.M/ A.N.M
९८२२३०४६३८

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
पाहिजेत
R.M.O- 2 | Driver Plus Receptionist- 2
BSC Nursing - 2 | Maintanance - 2
Data Operator (MJPJAY & cashless Department) - 2
डॉ. प्रविणकुमार पानसरे | डॉ. दिपाली पानसरे
संपर्क – ९४२०८५४३०६ / ७४९९१७६८६४
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग – प्रसुति
• मुळव्याध–भगंदर–फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# श्री गणेशाच्या नामघोषाने रामेश्वर नगरी दुमदुमली



धांदरफळ बु. (प्रतिनिधी)- महाराष्ट्र शासनाच्या माझी वसुंधरा ६.० या अभियानांतर्गत संगमनेर तालुक्यातील धांदरफळ बु. ग्रामपंचायतीची राज्यस्तरीय सहभागासाठी निवड झाली असून यापूर्वी विभागीय स्तरावर तृतीय क्रमांक मिळवून १५ लाख रुपयांचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. या अभियानाचा भाग म्हणून यंदा श्री क्षेत्र रामेश्वर देवस्थान, ग्रामपंचायत धांदरफळ बुद्रुक व तालुका पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने गणेश विसर्जनाचे नियोजन करण्यात आले. पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी रामेश्वर कुंडाची निर्मिती करून शाडूच्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. तसेच निर्माल्य कलश तयार करून जमा झालेल्या निर्माल्यापासून गांडूळ खत तयार करण्याचा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला.

भाविकांच्या सेवेसाठी स्वदेश युवा प्रतिष्ठान व ग्रामपंचायतीने माझी वसुंधरा टीम स्थापन करून गणेश आरती व्यवस्था, सूचना फलक, स्वच्छता उपक्रम यासारख्या अनेक सोयी उपलब्ध करून दिल्या. गणेशआरती प्रसंगी पोलीस सहा. निरीक्षक विकास काळे म्हणाले की, माझी वसुंधरा अभियानांतर्गत हाती घेतलेले हे उपक्रम परिसरातील ग्रामपंचायतींसाठी प्रेरणादायी ठरतील.

गणेश विसर्जन व्यवस्थापनात तानाजी बर्डे, नवनाथ नाईकवडी, अविनाश देशमुख, मोहन देशमाने, सचिन देशमाने, भाऊराव बर्डे, दत्ता कासार, डॉ. संजय थोरात, पांडुरंग घोलवड, अमोल त्रिभुवन, सचिन काळे, राजेश शिंदे, प्रशांत देशमाने आदींनी सक्रिय सहभाग घेतला. देवस्थानचे अध्यक्ष सुनील देशमुख, उपाध्यक्ष विजय कोल्हे, विजय शेटे यांनीही उत्तम व्यवस्थापन पाहिले.

यशस्वी आयोजनासाठी स्वदेश उद्योग समूहाचे संस्थापक बाळासाहेब देशमाने, सरपंच उज्वला देशमाने, उपसरपंच संकेत वलवे, ग्रामविकास अधिकारी सुरेश मंडलिक, ग्रामपंचायत सदस्य, स्वदेश युवा प्रतिष्ठान अध्यक्ष नवनाथ देशमाने व विश्वस्त मंडळ यांनी विशेष प्रयत्न केले.

# ज्येष्ठ मूर्तिकार देवीदास गोरे यांची 'अद्वितीय सेवा' पुरस्काराने गौरव



संगमनेर (प्रतिनिधी)- सन १९८५ पासून साळीवाडा तरुण मित्र मंडळ हे लोकमान्य टिळकांच्या अभिप्रेत समाजजागृतीपर गणेशोत्सवाचे ध्येय अखंड जोपासत आहे. या मंडळाचा मुख्य आकर्षण म्हणजे प्रसिद्ध मूर्तिकार देवीदास गोरे सर यांची सृजनशील कलाकृती. वर्षभरात घडलेल्या सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरणीय आणि राष्ट्रीय घटनांना स्पर्श करणाऱ्या या मूर्ती केवळ कलात्मक नसून प्रबोधनपर संदेश देणाऱ्या असतात.

### विविध साहित्यांपासून घडलेले श्रीगणेश

गोरेंनी आजवर साकारलेल्या गणेशमूर्ती ही नाविन्यपूर्णतेची परंपरा आहे, प्लास्टिकचा प्रश्न अधोरेखित करण्यासाठी प्लास्टिकपासूनचा गणेश, ई-कचऱ्याचा पुनर्वापर दाखवण्यासाठी कॉम्प्युटर साहित्याचा गणेश, भाजीपाल्याचा गणेश, गुळाचा गणेश, भांड्यांचा गणेश, पाईपचा गणेश, लॉन्सपासूनचा गणेश, नारळाचा गणेश, चेंडूंचा गणेश, फुग्यांचा गणेश, केळीच्या घडांचा गणेश, गिफ्ट पेपरचा गणेश, फरशी साहित्याचा गणेश, वाद्यांचा गणेश, टोपल्यांचा गणेश, मोटारसायकलच्या पार्ट्सपासूनचा गणेश, अगदी कोरोनाकाळातसुद्धा इंजेक्शन, मास्क, सॅनिटायझर यापासून बनवलेला कोरोना गणेश, या सर्व मूर्तींमध्ये संदेश स्पष्ट - समाजातील समस्या, प्रश्न आणि घडामोडी यांचे प्रतिबिंब म्हणजे गणेशमूर्ती, समाजजागृतीचा अनोखा ध्यास कोरोनाकाळात गोरे सरांनी मूर्ती तयार करून ऑनलाईन आरती केली आणि विसर्जनही वर्कशॉपमध्येच केले, जेणेकरून लोकांना धोका पोहोचू नये.

मागील वर्षी महिलांवरील अत्याचारांच्या घटनांना आवाज देण्यासाठी बाहुल्यांच्या गणेशमूर्ती, तर यावर्षी (२०२५) ओला दुष्काळ व शेतकऱ्यांच्या वेदना मांडण्यासाठी दुधसाहित्यांचा गणेश साकारला.

### अवलिया कलाकाराचा गौरव

एका वर्षी आयपीएस कृष्ण प्रकाश यांनी उद्घाटनावेळी भावनिक शब्दांत गौरव केला -

हा कलाकार देव आणि मानव यामधला एक माध्यम आहे. वेगवेगळ्या साहित्यांतून देवाचे दर्शन घडवणारा अवलिया आहे.

त्यांची ही सेवा सलग ४० वर्षे अखंडपणे सुरू आहे. साळीवाडा मित्र मंडळ, त्यांचा परिवार व ग्रामस्थ यांचा मोठा पाठिंबा या कार्यामागे उभा आहे.

### पुरस्कार व गौरव

देवीदास गोरे यांच्या कलाकृतींची दखल थेट एबीपी माझा या वृत्तवाहिनीने घेतली असून, शेती साहित्यापासून साकारलेल्या गणेशासाठी त्यांना उत्तर महाराष्ट्रातील सर्वोत्तम देखाव्याचा पुरस्कार मिळाला आहे. त्यामुळे सर्वत्र त्यांचे कौतुक होत असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### प्रेरणा घेण्याजोगी परंपरा -

आजवरच्या प्रत्येक मूर्ती ही नवीन विचार, सामाजिक संदेश आणि कलात्मकतेचे अद्वितीय मिश्रण आहे. कुठल्याही प्रकारची नक्कल न करता सर्जनशीलतेच्या जोरावर घडवलेले हे उपक्रम म्हणजे खऱ्या अर्थाने समाजजागृतीची मूर्ती आहे.

# मनातलं पानावर या पुस्तकाचे प्रकाशन



संगमनेर (प्रतिनिधी)- जगातील सर्वात दुःख मलाच आहे असे अनेक जण समजून जीवन दुखी करतात. दुःख विसरा हसत रहा. शोधले तर प्रत्येक ठिकाणी आनंद आहे. व्यंग हे प्रत्येक ठिकाणी आहे. ते शोधण्याची कला अरविंद गाडेकर यांना असून त्यांच्या **मनातलं पानावर** हे पुस्तक सर्वांना आनंद देणारे ठरेल असा विश्वास ज्येष्ठ साहित्यिक डॉ. संजय कळमकर यांनी व्यक्त केला आहे. सह्याद्री महाविद्यालयाच्या के.बी दादा सभागृह येथे मनातलं पानावर या पुस्तकाचे प्रकाशन संपन्न झालं यावेळी ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी माजी आ. डॉ. सुधीर तांबे हे होते तर व्यासपीठावर दुर्गाताई तांबे, सुवर्णाताई मालपाणी, अरविंद गाडेकर, सविता गाडेकर, अनिल देशपांडे, ज्येष्ठ संपादक किसन भाऊ हासे, हिरालाल पगडाल, अमोल गवांदे, डॉ. संजय गोरडे, डॉ जी.पी. शेख, डॉ. संतोष खेडलेकर, सुखदेव इल्हे आदी मान्यवर उपस्थित होते.

**व्यंगचित्रांमधून भावना व्यक्त करण्याबरोबर मार्मिक टीका करणारे अरविंद गाडेकर यांचे लिखाण हे हलकेफुलके असून आनंद निर्माण करणारे आहेत. सोशल मीडियाच्या जमानतही वाचकांचा मोठा वर्ग असून नागरिकांच्या धावपळीच्या जीवनात त्यांना तणाव मुक्त करणारे व्यंगचित्रकार अरविंद गाडेकर यांचे लिखाण आहे.**

**– माजी मंत्री बाळासाहेब थोरात**

यावेळी बोलताना डॉ संजय कळमकर म्हणाले की, संगमनेरला साहित्य संस्कृतीची आणि जाणकार राजकीय नेतृत्वाची मोठी परंपरा आहे. माजी मंत्री थोरात यांनी संगमनेरला सर्व क्षेत्रात समृद्ध व अग्रेसर बनवले. साहित्य हे जीवनात आनंद निर्माण करते. प्रत्येकाला जशी दृष्टी त्यातून तशी सृष्टी दिसते. प्रत्येक क्षेत्रात व्यंग आहे ते शोधता आले पाहिजे आणि त्यातून आनंद निर्माण करता आलं पाहिजे. मात्र अनेक जण स्वतःच्या दुःखात चिंतेत असतात. जगाच्या तुलनेत तुमचे दुःख अत्यंत शूद्र आहे हे समजून तुम्ही आनंदी राहा. चिंतन मनन मधून विचारांची मोती बाहेर पडत असतात. कोरोना संकटात आपल्याला जवळची माणसे कळाली मात्र तरीही आपण सुधारलो नाही. प्री-वेडिंग नावाचा प्रकार हा अत्यंत धोकादायक असून तो बंदही झाला पाहिजे असे सांगताना अनेक विनोदी किस्स्यांनी त्यांनी सर्वांना खळखळून हसवले.

तर डॉ तांबे म्हणाले की, व्यंगचित्र ही अवघड कला असून अरविंद गाडेकर यांनी त्यातून आपले मोठे नाव केले आहे. सततचे परिश्रम सातत्य आणि प्रामाणिकपणा हे त्यांचे वैशिष्ट्य आहे . त्यांचा जीवन प्रवास हा सर्वांसाठी प्रेरणादायी असून त्यांच्या ललित कथांचे मनातलं पानावर हे पुस्तक लोकप्रिय होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तर दुर्गाताई तांबे म्हणाल्या की आर. के. लक्ष्मण यांनी व्यंगचित्रांमधून या क्षेत्राला नवी ओळख निर्माण करून दिली अरविंद गाडेकर यांनी व्यंगचित्राच्या माध्यमातून संगमनेरचे नाव राज्यात नेले. तर सुवर्णाताई मालपाणी म्हणाल्या की अरविंद गाडेकर यांचे साहित्य हे मनाला आनंद देणारे आणि हसवणारे आहे.

यावेळी साहित्य परिषदेचे दिलीप उदमले, मंगला पाराशर , ज्ञानेश्वर राक्षे ,निलेश पर्बत ,सुप्रिया गवांदे, अनुराधा आहेर , पुष्पाताई निराळी, अनघा खेडकर, मनोज साकी, सुरेश परदेशी ,मुकुंद डांगे , प्राचार्य ज्ञानेश्वर गोंटे, प्रा.शशांक गंधे, गिरीश सोमाणी , बाळकृष्ण महाजन, महेश गोडसे, विजय दीक्षित, शेख इदरीस, रामनाथ सातपुते ,अनुश्री खैरे, मंगल पेटकर, डॉ. किरण चांडक, स्मिता सुतार, लीना क्षत्रिय , अलोक बर्डे, सागर पन्हाळे , लहानू सदगीर स्वप्नील कोल्हे आदी सह साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक साहित्यिक तथा आकाशवाणीचे अभिवाचक अनिल सोमणी यांनी केले सूत्रसंचालन नामदेव कहांडळ व यश गाडेकर यांनी केले तर ज्ञानेश्वर राक्षे यांनी आभार मानले. यावेळी संगमनेर शहरातील नागरिक महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आरती वादावर गणपुले यांचा पलटवार



संगमनेर (प्रतिनिधी)- संगमनेरच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत मानाच्या पहिल्या गणरायाच्या आरतीवरून वाद निर्माण झाला. यावर प्रतिक्रिया देताना भाजपचे माजी शहराध्यक्ष ॲड. श्रीराम गणपुले यांनी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यावर पलटवार केला. गणपुले यांनी २०१२ च्या पाणीटंचाईच्या प्रसंगाची आठवण करून दिली आणि त्यावेळी थोरात यांनीच मानाच्या गणपतीची आरती स्थानिक आमदारांनीच करावी असे स्पष्ट सांगितल्याचा दाखला दिला. तरीही आज त्याच परंपरेला धक्का देण्याचा प्रयत्न केला जात असल्याची टीका त्यांनी केली.

यावर्षी पहिल्यांदाच दोन ताटांद्वारे आजी-माजी आमदारांकडून आरती घेण्याच्या प्रकारावर त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. आरतीचा मान कोणत्याही व्यक्तीचा नसून पदाचा आहे आणि हा मान नेहमी स्थानिक आमदाराचाच असतो, असे स्पष्ट करत त्यांनी थोरात आणि आप्पासाहेब खरे यांनाही लक्ष केले. गणपुले म्हणाले की, थोरात यांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय अनुभवामुळे मोठेपणा दाखवायला हवा होता; मात्र नवा दंडक घालून परंपरा मोडण्याचा प्रयत्न करणे हे घृणास्पद असल्याची टीका त्यांनी केली.

# विजय पतसंस्थेचा अथर्वशीर्ष आवर्तने कार्यक्रम उत्साहात



संगमनेर (प्रतिनिधी)- दि.०३ सप्टेंबर २०२५ रोजी विजय नागरी पतसंस्था, संगमनेर आयोजित व पुरोहित संघ, ब्राम्हण प्रतिष्ठान, राजस्थान युवक मंडळ, संस्कृत संवर्धन मंडळ यांच्या सहकार्याने मालपाणी लॉन्स संगमनेर येथे १ लक्ष श्रीगणपती अथर्वशीर्ष आवर्तने उत्साहात संपन्न झाले अशी माहिती विजय पतसंस्थेचे चेअरमन डॉ. पराग सराफ, व्हा. चेअरमन विशाल जाखडी व प्रकल्प प्रमुख प्रज्ञा डांगे यांनी दिली. संगमनेर शहरातील सर्व शाळांमधून ५००० विद्यार्थी व नागरिक उत्स्फुर्तपणे सहभागी झाले. विजय पतसंस्थेतर्फे शाळा व महाविद्यालयामध्ये अथर्वशीर्ष पठन स्पर्धा घेण्यात आल्या.

कार्यक्रमासाठी नीलमताई खताळ, पायल ताजने, दुर्गाताई तांबे, रचनाताई व श्री. मनीष मालपाणी व शहरातील विविध मान्यवर उपस्थित होते. डॉ. पराग सराफ यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. गणेश पूजनासाठी मनीष मालपाणी आणि विजय पतसंस्थेचे संचालक कमलाकर भालेकर सपत्नीक उपस्थित होते. सलग २१ वर्षे यशस्वीपणे असा उपक्रम राबवणारी विजय पतसंस्था हि एकमेव पतसंस्था असल्याचे समाधान उपस्थित भाविकांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विविध मान्यवर, विजय पतसंस्थेचे संचालक प्रवीण बेलापूरकर, संदीप मुळे, मैथिली कुलकर्णी, डॉ. केदार सराफ, विश्वजीत कुलकर्णी, प्रवीण रत्नपारखी, डॉ. उदय जोशी, बाळकृष्ण महाजन, रामनाथ जगताप, भीमाशंकर चकोर, डॉ. वैशाली कुलकर्णी, प्रवीण कर्पे, रवींद्र जोशी, विनायक कुलकर्णी, सरव्यवस्थापक योगेश उपासनी व कर्मचारी वृंद व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

SMFRI'S
VAMANRAO ITHAPE COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT
At-Velhale, Post - Rajapur, Tal- Sangamner, Dist- Ahilyanagar
(DTE CODE-5597)
Contact No-9822551002,8888176084,9975773397
Advertisement Inviting Application For Admission Against Vacant Seat After CAP Round (ACAP) for A.Y. 2025-26 (First Year)
Application are invited from the aspiring eligible candidates for admission against vacant seats, if any (as per the state CET CELL norms) after Cap rounds in the following programmes
1) B.Tech Programme- Courses
1) Computer Engineering
2) Information Technology
3) Electronics and Telecommunications
4) Artificial Intelligence
2) MBA Programme
3) MCA Programme
For any details ie. Application form, Schedule, Vacant seats, etc. Please Visit Our institute website www.vicoem.in

# पावसाळ्यात मुलांना आजारांपासून ठेवा दूर

पावसाळा जितका अल्हाददायक असतो तितकाच विषाणू, जीवाणू आणि यीस्ट (बुरशी) संसर्ग वाढीसाठी हा उत्तम काळ मानला जातो. उघड्यावरचे अन्न पदार्थ आणि दुषित पाण्यामुळे देखील जंतुंचा प्रादुर्भाव होऊ शकतो. या दिवसांमध्ये विषाणूजन्य ताप, मलेरिया, डेंग्यू आणि चिकनगुनिया यांसारख्या संसर्गाची लागण लहानग्यांना होण्याची शक्यता असते. डेंग्यू, मलेरिया (हिवताप) आणि चिकनगुनियाच्या ठराविक लक्षणांमध्ये ताप, अंगदुखी, पुरळ उठणे, उलट्या होणे आणि पोटात दुखणे यांचा समावेश आहे.

डेंग्यूच्या बाबतीत ओटीपोटात दुखणे, सतत उलट्या होणे, सुस्ती आणि रक्तस्त्राव यासारख्या धोकादायक लक्षणांकडे दुर्लक्ष करु नका आणि पालकांनी याकडे दुर्लक्ष न करता त्वरीत डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. दुषित अन्न व पाण्यामुळे टॉयफॉईड( विषमज्वर ), हेपॅटायटिस - ( कावीळ ) , गॅस्ट्रो ( अतिसार) यासारखे आजार होऊन मुलांना हॉस्पिटल मध्ये दाखल करावे लागू शकते. न्यूमोनिया हादेखील श्वसनासंबंधी दुर्धर आजार आहे, पावसाळी वातावरणात ह्याचे प्रमाण वाढून लहान मुलांमध्ये संक्रमण होण्याचा अधिक धोका असतो. सर्दी , खोकला व धाप लागणे किंवा श्वास जोरजोरात घेणे असे लक्षणे आढळल्यास बालरोगतज्ज्ञांना दाखवून घ्यावे पालकांनी आपल्या मुलाच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे.

पावसाळ्यात होणारे विविध आजारांपासून वाचण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना :

### स्वच्छतेकडे द्या लक्ष-

पालकांनी चांगल्या स्वच्छता आणि स्वच्छतेच्या सवयींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. शाळेतून किंवा खेळाच्या मैदानातून घरी आल्यानंतर मुलांना नियमितपणे हात धुण्यास आणि आंघोळ करण्यास प्रवृत्त करा. लहान मुलांना स्वतःची स्वच्छता पटकन कळत नाही. त्यामुळे त्यांच्या स्वच्छतेकडे पालकांनी काटेकोरपणे लक्ष द्यावे.

### बाहेरचे पदार्थ खाणे टाळा-

मुलांनी उकळलेले पाणी पिणे, बाहेरच्या अन्न पदार्थांचे सेवन टाळणे, घरी बनवलेल्या ताज्या अन्नाचे सेवन करणे आणि फळे आणि हिरव्या भाज्यांचा आहारात समावेळ करणे आवश्यक आहे, परंतु ते वापरण्यापुर्वी स्वच्छ पाण्याने धुतल्याची खात्री करा.



कच्च्या अन्नाचे सेवन टाळा, उच्च प्रथिनयुक्त आहार, व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन ई चा समावेश असलेल्या पदार्थांची निवड करा. जसे की आवळा, संत्री, शिमला मिरची, शेवग्याच्या शेंगा, सुकामेवा आणि तेलबिया यांचा आहारात समावेश करा.

### निरोगी अन्नाचे सेवन-

चरबीयुक्त पदार्थ, तेलकट पदार्थ खाल्ल्याने अपचन होऊ शकते. पालकांनी ही खात्री केली पाहिजे की त्यांचे मूल निरोगी अन्नाचे सेवन करत आहे. दह्यामध्ये प्रोबायोटिक/प्रीबायोटिक भरपूर प्रमाणात असते आणि ते नियमितपणे खाण्याचा प्रयत्न करावा. सीझनल फ्रुट्स कमीत कमी दररोज एक याप्रमाणे खाण्याची सवय लावा.मुलांना घरातील जेवणच द्यावे. पावसाळ्यात उघड्यावरील आणि तेलकट पदार्थ अजिबात खाऊ नयेत.

### साचलेल्या पाण्यापासून दूर राहा-

साचलेले पाणी हे डासांच्या उत्पत्तीचे ठिकाण असल्याने, डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी जार, फुलदाण्या, वॉटर कुलर, घराबाहेर किंवा डस्टबिनमध्ये साचलेले पाणी काढून टाका आणि आणि आजूबाजूचा परिसर स्वच्छ आणि कोरडी राखण्याचा प्रयत्न करा.

### घाणेरड्या पाण्यात मुलांना खेळू देऊ नका-

मुलाने पावसाच्या घाणेरड्या पाण्यात खेळू नये याची काळजी घ्या कारण असे केल्याने त्वचेची ॲलर्जी आणि संसर्ग होऊ शकतो. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात आपल्या लहान मुलांना घाणेरड्या पावसात खेळायला सोडू नये आणि जरी मुलं खेळली तरीही घरी आल्यानंतर त्यांना स्वच्छ आंघोळ घालावी आणि नखातील मातीही व्यवस्थित काढून टाकावी.

### मास्क वापरा-

गर्दीच्या ठिकाणी जाताना किंवा आजारी व्यक्तींच्या संपर्कात असताना शक्य तेव्हा मास्क व्यवस्थित( नाक व तोंड झाकले जाईल असे) लावावा, पालकांनी स्वतः ही कृती करावी तरच मुले ( ३ वर्षांहून अधिक वय असलेले) त्याचे अनुकरण करतील. श्वसन संबंधी आजार पसरण्यास त्यामुळे आळा बसेल.

### लसीकरण-

सरकारी रुग्णालयात उपलब्ध संपूर्ण लसीकरण केल्यामुळेही मुलांची प्रतिकारशक्ती उत्तम राहते व आजारी पडण्याचे प्रमाण कमी होते.

फक्त खाजगी रुग्णालयात उपलब्ध असणाऱ्या काही लसी जसे की टायफॉईड( विषमज्वर), हेपॅटायटिस ए( कावीळ अ), फ्लू लस, न्यूमोनिया बूस्टर, कांजण्या (varicella), मेंदूज्वर (Meningococcal), जपानीज मेंदूज्वर(Japanese Encephalitis) ह्या सर्व लसी वारंवार आजारी पडणाऱ्या मुलांना किंवा प्रतिकार शक्ती कमी असलेल्यांना डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उपयुक्त ठरू शकतात.

**डॉ. राहुल होळकर**
MBBS, MD, Pediatrics ,FIPC
बालरोग, नवजात शिशू व बालहृदयरोग तज्ञ
आयुष्यम् हॉस्पिटल, श्रमिक मंगल कार्यालय जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर जि. अहिल्यानगर.
८९९९२५८८३३

MOM-able फर्टीलीटी ॲन्ड टेस्ट ट्युब बेबी सेंटर
नाव नोंदणी संपर्क 8080-215-215 9699-327-301
DR. EKTA JAGDISH WABLE
M.B.B.S D.G.O.
Fellowship in Infertility (Pune)
IVF Consultant, Obstetrician & Gynaecologist
SERVICES
• स्त्री व पुरुष वंद्यत्व निवारण व चिकित्सा
• लॅप्रोस्कोपी (Laparoscopy)
• हिस्ट्रोस्कोपी (Hysteroscopy)
• आय. यु. आय (IUI)
• आय.व्ही.एफ (IVF) म्हणजेच Test tube baby
१००% पारदर्शकता
तुमची गोपनीयता ही आमची प्राथमिकता
नैतिकतेवर भर देऊन उच्च दर्जाची काळजी
अत्यंत अनुभवी आणि सक्षम टीम
मातृत्व सुख
2nd Floor, SANJIVAN HOSPITAL Opp. Hotel Prasad, Nashik - Pune Road, Sangamner - 422 605, Ahilyanagar
momable.ivf@gmail.com

PBM Jeweller's
अशोक चौक, गुंदेचा हॉस्पिटल समोर संगमनेर, जि. अ. नगर
पायल महोत्सव
ऑफर फक्त ५ ऑगस्ट पासून ०५ सप्टेंबर पर्यंत
गणपती महोत्सव निमित्त
चांदीच्या पायलवर १००% मजुरी फ्री
- संपर्क - 7599996999 8265036807
मे. पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)

पाहिजेत रिचवे सोल्युशन प्रायव्हेट लि.
प्रॉडक्ट डिस्पॅच असिस्टंट
मुलगा/ पुरूष
शिक्षण - १२ वी किंवा पदवीधर
स्वत:ाची दुचाकी आवश्यक
सॅलरी - १०,००० /-
संपर्क - 7385854266
पत्ता- रिचवे सोल्युशन प्रा. लि. पहिला मजला, गजानन व्हिलाच्या समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर, जि. अहिल्यानगर
www.richsolu.com Email - richwaysolution@Gmail.com



ADMISSION OPEN
concept-tree
शिकणं म्हणजे जिंकणं !
Think Sharp, rise fast
मागील २ वर्षांत concept tree चे सर्वाधिक विद्यार्थी Government आणि Autonomous कॉलेजेसमध्ये
11th & 12th (PCMB) + JEE / NEET / MHT-CET
CONTACT : 9009 8008 48
महाराणा प्रताप चौक, मालदाड रोड, राजमाता जिजाऊ मार्ग, संगमनेर
admission@ctree.in
सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाचे स्वप्न साकार करणारी कंसेप्ट-ट्री

# विधानपरिषद विरोधी पक्षनेतेपदासाठी काँग्रेसकडून शिवसेनेची मनधरणी

## थोरात, वडेट्टीवार यांनी घेतली ठाकरेंची भेट



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - विधान परिषदेच्या रिक्त झालेल्या विरोधी पक्षनेतेपदावर काँग्रेसच्या वतीने सभापती प्रा. राम शिंदे यांच्याकडे दावा करण्यात आला. अंबादास दानवे यांचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपदावर काँग्रेसने दावा केला. काँग्रेसचे गटनेते सतेज पाटील यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड करावी अशी मागणी काँग्रेसच्या वतीने सभापती प्रा. राम शिंदे यांच्याकडे करण्यात आली.

काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी प्रा. शिंदे यांची भेट घेऊन त्यांच्याकडे दावा केला. तत्पूर्वी वडेट्टीवार, थोरात यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन विरोधी पक्षनेतेपदासाठी काँग्रेसला पाठिंबा देण्याची विनंती केली. विधान परिषदेत काँग्रेसचे ७, शिवसेना ठाकरे गटाचे ६ तर राष्ट्रवादीचे (शरद पवार) ३ आमदार आहेत. संख्याबळानुसार परिषदेचे विरोधी पक्षनेतेपद मिळावे यासाठी आग्रही आहोत. ठाकरेंसोबत यावर चर्चा झाली असून शरद पवार यांच्याशीही चर्चा करणार आहोत. त्याचप्रमाणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे वडेट्टीवार यांनी सांगितले. महापालिका निवडणुकीत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासोबत युती करण्यास उत्सुक आहेत. ही उत्सुकता त्यांनी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार आणि बाळासाहेब थोरात यांच्याकडे बोलून दाखविली. महाविकास आघाडीत राज ठाकरे यांना घेण्याबाबत काँग्रेसने सावध भूमिका घेतली असून यासंदर्भात दिल्लीतील वरिष्ठांशी चर्चा केल्यानंतरच निर्णय घेतला जाईल.

# गीता परिवारतर्फे 'शक्ती-भक्ती संस्कार संगम' स्पर्धा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर गीता परिवाराच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'शक्ती-भक्ती संस्कार संगम' या उपक्रमाचा पहिला टप्पा यशस्वीपणे पूर्ण झाला आहे. या उपक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात फक्त बालवाडी व इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा १० सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर २०२५ दरम्यान पार पडणार आहे. या स्पर्धेसाठी सहभागी विद्यार्थ्यांना भगवद्गीतेच्या १२ व्या अध्यायातील किमान १० श्लोक पाठ असणे व सूर्यनमस्कार घालता येणे आवश्यक आहे. विशेष बाब म्हणजे, १२ व्या अध्यायातील किमान १० श्लोक पाठ करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यास शूज आणि सुंदर रंगीत प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेच्या तयारीसाठी प्रत्येक विद्यार्थ्यास सूर्यनमस्काराचे मार्गदर्शन व १२ व्या अध्यायाचे छापील पत्रक देण्यात येईल.

विद्यालयांनी या उपक्रमासाठी आपली नोंदणी तत्काळ करून सहभाग नोंदवावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क - ९५७९८ ९७००७ / ९७६५६ ३१५२५.

# भटक्या विमुक्तांचे बुधवारपासून मुंबईत आंदोलन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ज्या हैदराबाद गॅझेटचा आधार घेत मराठा समाजाला कुणबीचे आरक्षण दिले, त्याच गॅझेटचा आधार घेऊन आम्हा भटक्या विमुक्तांचा आदिवासी समाजात समाविष्ट करा, अशी मागणी भटक्या विमुक्त जमाती संघटनेचे अध्यक्ष, 'उपरा'कार लक्ष्मण माने यांनी केली. या मागणीसाठी १० सप्टेंबरपासून मुंबईत आझाद मैदानात उपोषण सुरू करण्याचा

इशाराही त्यांनी सरकारला दिला. या मागणीला पाठिंबा देत या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन येथील भटक्या विमुक्तांचे लढाऊ कार्यकर्ते शुभम शिंदे यांनी केले आहे.

भटक्या विमुक्तांच्या ४२ जमाती आहेत. त्यात कैकाडी रामोशी, वडार, कंजारभाट, लमाण, बंजारा, भामटा अशा १४ जाती विमुक्त जमाती व वैदू, कोल्हाटी, गोसावी, भोईर, नंदीवाले अशा २८ ते ३७ भटक्या जमाती आहेत. ते बलुतेदार नाहीत, तरीही त्यांना ओबीसीमध्ये दाखविले आहे. गुजरात कर्नाटक, आंध्र या राज्यांमध्ये या जमातींना आदिवासी प्रवर्गात दाखवले आहे. आम्हीही मागील ५० वर्षांपासून तीच मागणी करत आहोत. मात्र, आम्हाला तसे करता येत नाही, असेच सांगितले जात आहे. हा दुजाभाव सरकार करीत असल्याने आम्हाला देखील आंदोलन करावे लागत असल्याचे शुभम शिंदे यांनी सांगितले.

मुंबईत आंदोलन करणाऱ्या मराठा समाजाला त्यांच्या मागणीप्रमाणे कुणबी आरक्षण देताना सरकारने हैदराबाद गॅझेटचा आधार घेतला. त्यातील नोंदीनुसार प्रमाणपत्र दिले जाईल, असे सांगितले. याच हैदराबाद गॅझेटमध्ये आमच्या ४२ जमातींची नोंद आदिवासी म्हणूनच आहे. मग आता आम्हालाही याच गॅझेटचा आधार घेऊन कायदेशीर प्रमाणपत्र द्या, अशी मागणी करत लक्ष्मण माने यांनी भटक्या विमुक्तांचा लढा पुन्हा एकदा उभारला आहे.

## सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँक लिमिटेड, घुलेवाडी

रजि नं. ANR/SMR/BNK 1207/ 83 रजि. ता. ०७/०६/१९८३

**सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँक लिमिटेड, घुलेवाडी**

**पो. संगमनेर साखर कारखाना ४२२६०८, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर**

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

जावक क्रमांक -४३/११०० **(फक्त सभासदांकरीता)** दि. २९/०८/२०२५

मा. श्री./श्रीमती ______ ता. ______ जि. अहमदनगर

कळविण्यात येते की, आपल्या बँकेची सन २०२४ - २०२५ या आर्थिक **वर्षाची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दिनांक १३/०९/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुधाकर माधवराव जोशी यांचे अध्यक्षतेखाली** व **मा.आमदार बाळासाहेब थोरात साहेब** ( मा.महसुल मंत्री महाराष्ट्र राज्य) **तसेच मा. डॉ. सुधीरजी तांबे साहेब** (मा.सदस्य, विधान परिषद, म. राज्य ) यांच्या उपस्थितीमध्ये खालील विषयांवर विचार विनीमय करणेसाठी आयोजीत केलेली आहे. सदरच्या सभेसाठी ठिकाण **सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लि. कार्यस्थळ अमृतनगर, घुलेवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर राहील.** तरी सभासदांनी उपस्थित रहावे हि नम्र विनंती.

### सभेपुढे येणारे विषय

१. मागील दिनांक ३०/०८/२०२४ चे वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२. सन २०२४-२५ सालचा ४३ वा वार्षिक अहवाल ( ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षाचा) ताळेबंद व नफातोटा पत्रक वाचून कायम करणे
३. वैधानिक लेखापरिक्षक यांनी दिलेल्या सन २०२४-२५ सालचे ऑडीट रिपोर्टचे वाचन करणे व नोंद घेणे.
४. आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या वैधानिक लेखापरिक्षणाच्या दोष-दुरुस्ती अहवालाची वाचून नोंद घेणे.
५. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२४-२५ सालच्या नफा वाटणी व लाभांश वाटपास मान्यता देणे.
६. सन २०२५-२६ सालाकरिता मा. संचालक मंडळाने सादर केलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे व अहवाल सालात जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे..
७. मा. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे परिपत्रकानुसार आर्थिक वर्ष सन २०२५-२६ सालाकरिता संचालक मंडळाने नेमलेल्या वैधानिक लेखापरिक्षकास मान्यता देणे व मानधन ठरविणे.
८. बँकेच्या संचालक मंडळ सदस्य व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती देणे.
९. बँकेला नविन शाखा उघडणे, जागा भाड्याने घेणे / खरेदी करणे. नविन इमारत बांधकाम करणे इत्यादींसाठी होणाऱ्या खर्चास संचालक मंडळास अधिकार देणे.
१०. संचालक मंडळाने सुचविलेल्या परिशिष्ट 'अ' मधील पोटनियम दुरुस्तीस मान्यता देणे.
११. कर्मचारी सेवा नियमावली अद्यावत करणे बाबत
१२. मागील आर्थिक वर्षांत एकरकमी कर्ज परतफेड योजनेत तडजोड केलेल्या कर्जखात्यांना मंजूरी देणे.
१३. बाहेरून घ्यावयाच्या कर्जाच्या मर्यादेचे प्रमाण ठरविण्याचे अधिकार मा. संचालक मंडळास देणे
१४. धर्मदाय निधीतून देणगी मिळणेसाठी आलेल्या अर्जांचा विचार करुन देणगी देणेस संचालक मंडळास अधिकार देणे.
१५. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापात्र करणे.
१६. अपुरे शअर्स भाग असलेल्या सभासदांना शेअर्स रक्कम पुर्ण करण्यासाठी मुदतवाढ देणेबाबत
१७. थकित कर्जदारांपैकी काही कर्जदारांचे नॉन बँकींग ॲसेट करणेसाठी मंजुरी मिळणे बाबत
१८. वैधानिक लेखापरिक्षकांनी बुडीत या वर्गवारित प्रमाणित केलेल्या अनुत्पादित कर्ज खात्याची नावे बाकी वसुलीचा अग्रहक्क आबाधित ठेवून सदर वार्ता निर्लेखिकरण करणेबाबत मंजुरी देणे.
१९. शेअर्स रक्कम पूर्ण करणेबाबत.
२०. मा. अध्यक्ष साहेब यांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

**श्री. सुशिल गुजराथी**
मुख्य कार्यकारी अधिकारी
मा. संचालक, मंडळाच्या आदेशाने

**✻ स्थळ – घुलेवाडी**
**दि. २९/०८/२०२५**

**टिप –**

बँकेच्या नविन पोटनियमानुसार एक शेअर्स ची किंमत रु. २५ ऐवजी रु. २५००/- झालेली आहे. रु. २५००/- पुर्ण होण्यासाठी फरकाची रक्कम दि. ३०/९/२०२५ पुर्वी पुर्ण करावी.

**सुचना –**

१) सभेच्या नियोजित वेळेत गणपुर्ती न झाल्यास सभा तहकुब केली जाईल. व तहकुब झालेली सभा त्याच दिवशी अर्धा तास थांबुन घेण्यात येईल. त्या सभेस गणपुर्तीची व वेगळ्या सुचनेची आवश्यकता राहणार नाही.
२) सन २०२४-२५ चा वार्षिक अहवाल ( ताळेबंद व नफा तोटा पत्रक) कार्यालयीन वेळेत बँकेचे मुख्य कार्यालय, घुलेवाडी व सर्व शाखा आणि विस्तारकक्ष येथे मागणी केल्यास उपलब्ध करुन देण्यात येईल.
३) सभासदांना जर काही सूचना करावयाच्या असतील तर त्यांनी दि. ०६/०९/२०२५ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयात मुख्य व्यवस्थापक यांचेकडे लेखी द्याव्यात..

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
२९ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13




# साकुर पठार भागातील ग्रामसडक योजना रस्त्यांच्या मंजुरीसाठी उपमुख्यमंत्र्यांना निवेदन



संगमनेर - साकुर पठार भागातील दीर्घकाळ प्रलंबित असलेले रस्ते लवकरात लवकर मंजूर करण्यासाठी भाजप तालुका अध्यक्ष गुलाबराजे भोसले, शिवसेना उपजिल्हा प्रमुख रणजित ढेरंगे तसेच खांबे गावचे सरपंच रवींद्र दातीर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले.

सदर निवेदनात साकुर - बिरेवाडी, शिंदोडी - ठाकरवाडी, खांबे - खरशिंदे, तास्करवाडी - खंडेरायवाडी, डिग्रस - रणखांब या पाच महत्त्वाच्या रस्त्यांचा समावेश असून हे सर्व रस्ते पठार भागातील गावांना जोडणारे प्रमुख मार्ग असून शालेय विद्यार्थी, शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करण्यास व शेतकऱ्यांना शेतीमाल वाहतुकीस मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.

मागील काही महिन्यांपूर्वी हे रस्ते मंजूर झाले होते. परंतु शासनाने काही कारणास्तव मंजुरी मागे घेतल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरली होती. त्यामुळे या रस्त्यांना तातडीने मंजुरी द्यावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या रस्त्यांसाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे व आ. अमोल खताळ सातत्याने शासनदरबारी पाठपुरावा करीत आहेत. लवकरच हे रस्ते पुन्हा मंजूर करून तातडीने कामे सुरू केली जातील, असे आश्वासन दिले.

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय् KH
कुटे हॉस्पिटल ॲण्ड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthetist
डॉ. प्रदीप भा. कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
• मॉड्युलर ऑपरेशन थिएटर • एसी/डिलक्स रुमस् • महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध • तज्ञ डॉक्टर्स व प्रशिक्षीत स्टाफ • डायलेसीस विभाग • इन्टरकॉम, टिव्ही •
• ९ बेडचा सुसज्ज आय.सी.यु. विभाग व सुसज्ज अपघात विभाग • नर्स कॉल बेल सिस्टीम • गरम पाण्यासाठी सोलर • सेंट्रल ऑक्सीजन व सक्शन • सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया •
• सर्व प्रकारचे मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा उपलब्ध • अस्थिरोग तज्ञ पुर्णवेळ उपलब्ध • अत्याधुनिक सुविधा • ॲम्बुलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा ८८८ ८८८ २२२५ •
४० फुटी डि. पी. रोड, ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर, जि.अहिल्यानगर
(02425) 226688, 226686

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25